**महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**
**मजुरीचे दरपत्रक**

**महाराष्ट्र शासन**
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांक: मजुरी-२०१२/प्र. क्र.१९/मग्रारो-१.
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २० एप्रिल, २०१२

पहा: (१) शासन निर्णय क्रमांक : मजुरी-२००९/प्र.१११/मग्रारो-१, दि.९ नोव्हेंबर, २००९.
(२) शासन पत्र नि.वि.क्र.मजुरी-२०११/प्र.क्र.१०/मग्रारो-१, दि. १४ फेब्रुवारी, २०११
(३) केंद्र शासनाची दिनांक १४ जानेवारी, २०११ ची अधिसुचना
(४) केंद्र शासनाची दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ ची सुधारित अधिसुचना
(५) शासन निर्णय क्रमांक : मजुरी-२०११/प्र.क्र.१५/मग्रारो-१, दि. १९ मार्च, २०११.
(६) केंद्र शासनाची दिनांक २३ मार्च, २०१२ ची अधिसुचना
(७) शासन पत्र नि.वि.क्र.मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.१९/रोहयो-१, दिनांक ३१ मार्च,२०१२

**प्रस्तावना :-**

यापुर्वी रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजूरांना देण्यात येणारे वेतन रोहयो कायदा १९७७ च्या कलम-७ (२) (सात) अन्वये संबंधित कृषि परिमंडळातील शेतमजुरांना देय असलेल्या किमान वेतनाशी निगडीत होते. शेतमजुरांचे किमान वेतन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने अधिसूचनेद्वारे सुधारित केल्यानंतर त्याआधारे रोजगार हमी योजना व महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांच्या मजुरीमध्ये परिमंडळनिहाय वाढ/सुधारणा करण्यात येत असे.

मात्र, गतवर्षी केंद्र सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५ (४२ वा २००५) मधील कलम ६ नुसार त्यांचे संदर्भांकित दिनांक १४ जानेवारी,२०११ च्या अधिसुचनेनुसार महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील मजुरांना द्यावयाच्या दैनिक मजुरीचे दर राज्यनिहाय निश्चित केल्यानुसार महाराष्ट्रासाठी मजुरीचा दर रुपये १२७/- (रुपये एकशे सत्तावीस फक्त) प्रति दिन निश्चित केला होता व सदर्भांकित दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ च्या अधिसुचनेस अनुसरुन उपरोक्त दिनांक १४ फेब्रुवारी, २०११ च्या शासन पत्रानुसार राज्यात लागू करण्यात आला होता.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजुरीचे दर हे महाराष्ट्र रोजगार हमी कायदा १९७७ मधील कलम ७ (२) (सात) नुसार निश्चित केले जातात. त्यातील तरतुदीनुसार भारत सरकारने केंद्रीय कायदा अन्वये निश्चित केलेले मजुरीचे दर हे महाराष्ट्र ग्रामीण रोहयो वरील मजुरांना देखील लागू होतात. त्यानुसार केंद्र शासनाच्या उपरोक्त दिनांक २३ मार्च, २०१२ च्या अधिसुचनेद्वारे दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून महाराष्ट्रासाठी मजुरीचा दर रुपये १४५/- प्रति दिन निश्चित करण्यात येत आहे. (तसे शासन पत्र क्र.मग्रारोहयो-२०१२/प्र.क्र.१९/रोहयो-१ दि.३१.०३.२०१२ अन्वये सूचित केले आहे). त्या आधारे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेवरील मजुरीचे दरपत्रक निश्चित करण्यात आले आहे. त्याचा सविस्तर तपशील सोबत जोडपत्र - एक मध्ये दिलेला आहे.

२. सदर दरसूची दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून लागू करण्यात येत असल्यामुळे दिनांक १ एप्रिल, २०१२ पासूनच्या हजेरीपटाच्या महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांवर सुधारित दराप्रमाणे मजुरी देय होईल. त्या दिनांकापासून सुधारित दराची अंमलबजावणी झाली असे समजावे. दिनांक १ एप्रिल, २०१२ पूर्वीच्या हजेरीपटाच्या कामांची मजुरीची सुधारित दराने फरकाची रक्कम काढण्यात येऊ नये.

३. या शासन निर्णयाच्या समवेत जोडपत्र-चार व पाच मध्ये दर्शविलेल्या दैनिक रोजंदारीवर काम करणा-या मजुरांशिवाय महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने खाली इतर काही कामांसाठी दैनिक रोजंदारीवर काम करणा-या मजुरांनाही परिच्छेद-१ मध्ये निर्धारित केल्याप्रमाणे प्रतिदिनी मजुरी द्यावी.

४. या दरपत्रकामध्ये अकुशल बाबीसाठी अकुशल मजुरांना दयावयाच्या मजुरी संबंधीचे दर निर्धारित करण्यात आले आहेत. कुशल बाबींसाठीचे दर त्या-त्या खात्याच्या विहित दरसूचीनुसार देण्यात यावेत. सर्वसाधारणतः जलसंधारण, जलसंपदा, रस्ते, वनीकरण इत्यादीच्या कामाच्या ज्या अकुशल बाबी आहेत, त्या सर्व अकुशल बाबींचा यात अंतर्भाव केलेला आहे.

५. संबंधित खात्याच्या कामावरील भरावाचे मोजमाप घेताना संकुचन घटीबाबत जलसंपदा खात्याच्या विहित नियमाप्रमाणे मोजमाप घेऊन मजुरी अदा करावी.

६. राज्यातील जनजाती उपयोजना क्षेत्रे (जोडपत्र-दोन) तसेच डोंगराळ क्षेत्रे (जोडपत्र-तीन) येथे उल्लेख केलेल्या शासन निर्णयान्वये शासनाने घोषित केलेले आहेत. सदर क्षेत्रासाठी मजुरीचे दर ठरविताना जोडपत्र-दोन व जोडपत्र-तीन मधील शासन निर्णयातील जिल्हे/ तालुके/ गावे/ पाडे/ वस्त्या यांचा आदिवासी उपयोजना क्षेत्र व डोंगराळ क्षेत्र यामध्ये भागशः अथवा पूर्णतः समावेश आहे किंवा कसे, याची खात्री शासन निर्णयानुसार करुन मगच मजुरीच्या दराबाबत कार्यान्वयीन यंत्रणेने निर्णय घ्यावा.

७. हे दरपत्रक निर्धारित करताना एकूण शंभर मीटर अंतरापर्यंतची वाहतूक मजूरांमार्फत डोक्यावरुन करणे गृहीत धरले आहे व शंभर मीटर पेक्षा अधिक अंतरावरची वाहतूक ही सामान्यतः गाढव, बैलगाडी, ट्रॅक्टर किंवा टप्पर याद्वारे करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे शंभर मीटर पेक्षा अधिक अंतरावरील वाहतुकीचा खर्च हा कामाच्या कुशल भागावरील खर्च समजण्यात यावा आणि अशा कामाची मजुरी संबंधित खात्याच्या विहित दरपत्रकानुसार देण्यात यावी. काही विशिष्ट ठिकाणी व विशिष्ट परिस्थितीत १०० मीटर पेक्षा जास्त अंतरावरील वाहतूक मजुरांमार्फत डोक्यावरुन करण्याची गरज भासत असेल तर तसे करण्यास हरकत नाही. पण त्यासाठीचे वाहतुकीचे दर हे संबंधित खात्याच्या दरसूचीनुसारच राहतील.

८. शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक : रोहयो-२००३/प्र.३८/रोहयो-६,दिनांक २६ ऑगस्ट,२००३ मधील (अ)(६) मजुरांना पिण्याचे पाणी कामाच्या ठिकाणी पुरविण्याबाबतचे दर व

(क) शासन निर्णय क्रमांक मग्रारो-२०१०/प्र.क्र.०४/रोहयो-१. दिनांक २२ ऑक्टोबर,२०१० अन्वये मजुरांच्या स्वतःच्या हत्यारांचे भाडे (रुपये २ प्रती मनुष्य दिन) व धार लावण्याचा खर्च (रुपये २/- प्रती मनुष्य दिन) नुसार देण्यात यावे.

९. कठीण खडकात खोदाई करणे (सुरुंग लावून अथवा सुरुंग विरहीत) ही बाब पुर्णपणे कुशल समजण्यात यावी.

१०. कामाची गुणवत्ता राखण्यासाठी खात्याचे नियमानुसार घ्यावयाच्या गुणनियंत्रण चाचण्यांकरिता अंदाजपत्रकात तशी तरतुद करावी.

११. **हे आदेश दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून अंमलात येतील.**

१२. हे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक / मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक यांनी ताबडतोब सर्व कार्यान्वयीन यंत्रणांना कळवावेत.

१३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१२०४२३१०४५२५४२५००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

सोबत : जोडपत्रे.

20/4/2012

**(आर. विमला)**
**उप सचिव (मग्रारोहयो) नियोजन विभाग.**

प्रत:-

मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
अतिरिक्त मुख्य सचिव,
शासनाचे सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय, मुंबई,
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचानालय,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरिता),
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर,
प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर,
कृषि आयुक्त, पुणे,
संचालक, मृदसंधारण व्यवस्थापन, पुणे,
संचालक, फलोत्पादन, पुणे,
संचालक, सामाजिक वनीकरण, पुणे,
सर्व, विभागीय आयुक्त,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), मुंबई,

महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा), नागपूर,
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई,
मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,
मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) विभाग, पुणे,
उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ रोजगार हमी समिती, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
सर्व विशेष कार्य अधिकारी व पदसिध्द उपविकास आयुक्त (रोहयो विभागीय आयुक्त कार्यालय,
सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ,
सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
सर्व अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्था.स्तर) मंडळ,
सर्व जिल्हा अधीक्षक, कृषी अधिकारी,
सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग,
सर्व कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,
सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग,
सर्व कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद सिंचन विभाग,
सर्व कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिकस्तर) विभाग,
सर्व विभागीय वन संरक्षक,
सर्व विभागीय वन अधिकारी,
सर्व उप संचालक, सामाजिक वनीकरण,
सर्व गट विकास अधिकारी,
सर्व तहसीलदार,
लेखा व अधिदान अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
सर्व कोषागार अधिकारी,
सर्व उप कोषागार अधिकारी,
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो),
सर्व प्रकल्प अधिकारी, जनजाती उपयोजना,
सारसंग्रह रोहयो-१,
निवडनस्ती, रोहयो-१.

# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

# मजुरीचे दरपत्रक

## दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून लागू

## जोडपत्रे

(शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. क्र.मजूरी-२०१२/प्र.१९/मग्रारो-१,
दिनांक २० एप्रिल २०१२ चे जोडपत्र एक ते सहा पृष्ठ क्र. ६ ते २४)

## जोडपत्र - एक

## महाराष्ट्र रोजगार हमी योजनेखाली सर्व कार्यान्वयीन यंत्रणांच्या प्रस्तावित करण्यात आलेल्या मजुरीची दिनांक १ एप्रिल, २०१२ पासून सुधारीत दर अनुसूची

| बाब क्र. | प्रस्तावित बाब | एकक | एककाचा दर रुपये १४५/- | |
|---|---|---|---|---|
| | | | सुधारित दर | सुधारित दर |
| | | | जनजाती उपयोजना /डोंगराळ क्षेत्रासाठी दर | इतर क्षेत्रासाठी दर |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | जमिनीत, सर्व प्रकारची माती, गाळ, चुना, शाडू, वाळू / रेती अशा भूस्तरात खोदकाम तपासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थराथरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | ७०.९० | ६१.६५ |
| | (ब) आर्द्रस्थितीत खोदाई (सर्वसाधारण) | घनमीटर | ८५.१७ | ७३.९८ |
| | (क ) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | ८८.६० | ७६.९५ |
| २ | जमिनीत मऊ मुरुमातील भूस्तरात खोदकाम तासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री -निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थराथरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | ८९.२८ | ७७.७५ |
| | (ब) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | १११.६६ | ९७.१६ |
| ३ | जमिनीत कठीण मुरुमातील भूस्तरात खोदकाम तासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थराथरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | १२२.२८ | १०६.३० |
| | (ब) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | १५२.६५ | १३२.७८ |
| ४ | जमिनीत कठीण मुरुम ज्यामध्ये ०.१ घ.मी. पेक्षा कमी आकाराचे धोंडे असतील अशा भूस्तरात खोदकाम तासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थराथरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | १४४.५४ | १२५.७० |
| | (ब) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | १८०.८५ | १५७.२२ |
| ५ | कठीणमान भूस्तरात जमिनीत खोदकाम तासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री । निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थराथरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | २२२.६४ | १९३.६४ |
| | (ब) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | २७८.२४ | २४२.०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | मऊ खडकाचे भूस्तरात जमिनीत खोदकाम तासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थरावरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | २७७.७८ | २४१.५१ |
| | (ब) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | ३४७.३१ | ३०१.९९ |
| ७ | जांभ्या खडकातील भूस्तरात जमिनीत खोदकाम तासणीसह करणे व खोदून काढलेली सामग्री निर्देश दिल्याप्रमाणे १० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेणे व ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थरावरात १.५० मीटर उंचीपर्यंत नेऊन टाकणे वा पसरविणे वा फरेत भरणे. | | | |
| | (अ) खोदाई - (सर्वसाधारण) | घनमीटर | ३६१.४७ | ३१४.३२ |
| | (ब) विहिरीसाठी खोदाई दर | घनमीटर | ४५२.०१ | ३९३.१० |
| ८ | सर्व प्रकारची माती, गाळ, चुना, शाडू ,रेती, वाळू, मऊ मुरुम, कठीण मुरुम, दगड-धोंडे, सर्व आकाराची खडी, इत्यादी सुरवातीच्या १० मीटर अंतरापलिकडे एकुण १०० मीटर अंतरापर्यंत डोक्यावर वाहून नेण्यासाठी अतिरिक्त दर. | | | |
| | क्र. अतिरिक्त अंतर मीटर | | | |
| | १ १० | घनमीटर | १६.४४ | १४.२७ |
| | २ २० | घनमीटर | ३०.२६ | २६.३७ |
| | ३ ३० | घनमीटर | ४४.१९ | ३८.४८ |
| | ४ ४० | घनमीटर | ५८.०० | ५०.४६ |
| | ५ ५० | घनमीटर | ७२.०४ | ६२.६८ |
| | ६ ६० | घनमीटर | ८५.८६ | ७४.६७ |
| | ७ ७० | घनमीटर | ९९.७९ | ८६.७७ |
| | ८ ८० | घनमीटर | ११३.७२ | ९८.८७ |
| | ९ ९० | घनमीटर | १२७.६५ | ११०.९८ |
| | १० १०० | घनमीटर | १४१.३५ | १२२.९६ |
| ९ | आवरण किंवा गाभा भराईकरिता भरावाच्या ठिकाणी आणलेल्या खालील प्रकारच्या सामग्रीतील झाडेझुडपे, गवताची मुळे इत्यादी काढून टाकणे, ढेकळे फोडणे व ती पसरविणे याकरिता भरावाचे थरासाठी योग्य पातळीपर्यंत संस्करण (Earthwork Dressing) करणे- | | | |
| | (अ) माती, मऊ मुरुम व कठीण मुरुम व धोंडे सामग्रीसाठी | घनमीटर | ६.६२ | ५.८२ |
| | (ब) मऊ/जांभा खडक/ कठीणमान | घनमीटर | १२.६७ | ११.०७ |
| १० | मऊ / कठीण मुरुम / गाळ / वाळू / रेती वा सर्व प्रकारची माती आवश्यकतेप्रमाणे कामाच्या ठिकाणी गोळा केलेल्या ढिगापासून वाहुन नेणे, पसरविणे / आंथरणे व त्याचे छेदन / संस्करण करणे इत्यादी सर्व कामे पूर्ण करणे. (वहन अंतराचा अंतर्भाव नाही) | घनमीटर | २८.४३ | २४.६६ |
| ११ | आदेशानुसार जमीन कडेकडेने साफ करणे व २० सें.मी. परीघापर्यंतची मुळे काढणे या सर्व गोष्टी १० मी. अंतरापर्यंत हलविणे. | चौ.मीटर | ३.७७ | ३.३१ |
| १२ | सर्व प्रकारच्या भूस्तरातून उपलब्ध झालेली सामग्री खड्ड्यापासून/ ढीगापासून प्रत्येक १.५ मीटर जादा उंचीवर उचलून नेण्यासाठी आणि / किंवा यांच्या भागासाठी जादा दर - | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | क्र. अतिरिक्त उचल अंतर मीटर | | | |
| | १ १.५० | घनमीटर | ४०.३० | ३५.०५ |
| | २ ३.०० | घनमीटर | ५८.०० | ५०.४६ |
| | ३ ४.५० | घनमीटर | ८३.३५ | ७२.५० |
| | ४ ६.०० | घनमीटर | १०८.८१ | ९४.५४ |
| | ५ ७.५० | घनमीटर | १३३.८१ | ११६.४६ |
| | ६ ९.०० | घनमीटर | १५९.२७ | १३८.४९ |
| | एकूण १०.५० मी.च्या पुढे अ.क्र.१२ (६) अधिक प्रती मी.उंचीकरीता. | घनमीटर | २७.८६ | २४.२० |
| १३ | माती / मुरुम बांधावर प्रत्येक ३० से.मी. जाडीचे सैल (लुज) थरावर पाणी साठा शिपण करणे. | घनमीटर | १४.२७ | १२.३३ |
| १४ | माती / मुरुम बांधावर प्रत्येक ३० से.मी. जाडीचे थरावर हात ठोकळ्याव्दारे आवश्यक घनीकरणासाठी निर्देशाप्रमाणे धत्तीकरण करणे. | घनमीटर | २१.३५ | १८.६१ |
| १५ | ३० मीटर परिसरात पसरलेल्या क्षेत्रातून दगड / धोंडे गोळा करणे व आदेशानुसार त्यांचा बांध तयार करणे (Loose Boulder Structure & Rock Toe) व दगडी चिपांनी पोकळ्या भरुन घनीकरण करणे इत्यादी | घनमीटर | ११३.३७ | ९८.६५ |
| १६ | आदेशानुसार जागेवर उपलब्ध असलेली झुडपे तोडून त्यापासून ३० से.मी. ते ४५ से.मी. लांबीच्या आकाराच्या खुंटया तयार करणे. एका बाजूने अणकुचिदार करणे व प्रत्येकी १०० खुंटयांची १ मोळी तयार करणे व त्याचा साठा करणे- | १०० खुंट्या करिता | २७.८६ | २४.२० |
| १७ | ठराविक अंतरावर खुंटया लावण्यासाठी दिलेल्या आदेशानुसार क्षेत्राची गटामध्ये विभागणी करणे. ढिगामधून खुंटया आणणे व जमिनीमध्ये त्या ठराविक अंतरावर रोवणे. | १०० खुंट्या करिता | ३०.२६ | २६.३७ |
| १८ | आदेशानुसार जलशोषक खंदक वा सलग समतल चर वा त्रिलग समतल चर तयार करण्यासाठी ६० से.मी. रुंदीचे व ३० से.मी. खोलीचे आदेश दिल्यानुसार विविध लांबीचे जलशोषक खंदक तयार करण्यासाठी खालील भुस्तरात खोदकाम करणे व खोदकामातुन निघालेले साहित्य आदेशानुसार खंदकाबाहेर पसरविणे वा बांध घालणे. | | | |
| | (अ) माती व मऊ मुरुमात | घनमीटर | ५९.६० | ५१.७२ |
| | (ब) कठीण मुरमात | घनमीटर | ८३.३५ | ७२.५० |
| १९ | पुर्वी नांगरलेल्या/वखरलेल्या जमीनीवरील सैल मातीतील ढेकळे फोडून फावड्याने माती ओढन वाफे तयार करण्यासाठी उरळी ज्याची तळासरी / पायथा रुंदी ६०.०० से.मी. व माथा रुंदी ३०.०० से.मी. व आवश्यक उंचीच्या आकाराच्या उरळया बांधणे (नांगरणी आवश्यकतेनुसार ट्रॅक्टरव्दारे करावी व त्याचा दर कृषि खात्यानुसार जादा आकारावा) | मीटर | १.७१ | १.४८ |
| २० | कोणत्याही आकारमानाचा वाफा तयार करण्यासाठी जमिनीत १५ से. मी. खोलीपर्यंत खोदकाम करणे, मातीची ढेकळे फोडणे, दगड / डबर / मुळे इत्यादी आक्षेपार्ह बाबी काढून वेगळया करणे व आवश्यक त्या आकाराचा गादीवाफा / गवताचा वाफा / उंचवटा तयार करणे. | चौ.मीटर | ५.७१ | ४.९१ |
| २१ | आदेशानुसार ४ मी. लांबीचे ६० से.मी. रुंदीचे व ३० से.मी. खोलीचे एकाआड एक समतल चर तयार करण्यासाठी खोदकाम करणे, खोदलेली वरच्या मऊथरातील माती चराच्या वरच्या अंगाला जमा करणे व खालील थरातील कठीण माती वा मुरुमाचा खालच्या अंगाला उंचवटा तयार करणे इत्यादी. | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (अ) माती व मऊ मुरुमात | प्रती चर | ४३.३९ | ३७.६८ |
| | (ब) कठीण मुरमात | प्रती चर | ६०.०६ | ५२.२८ |
| २२ | उपरोक्त बाब क्र.२१ मधील आदेशानुसार खोदलेल्या चराच्या वरच्या अंगाला जमा केलेली माती चरात ओढणे व उर्वरीत चर पुर्ण भरुन काढण्यासाठी वरच्या अंगाची माती फावड्याने खरडून चर अशाप्रकारे भरुन काढणे. | प्रती चर | २५.५७ | २२.२५ |
| २३ | उपरोक्त बाब क्र.२२ मधील आदेशानुसार तयार करण्यात आलेल्या चरात खत घालणे व त्याचे मिश्रण करणे. (यामध्ये खताच्या किमतीचा अंतर्भाव -नाही ) | प्रती चर | १०.०५ | ८.६८ |
| २४ | कामाचे ठिकाणी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या माती, रेती, शेणखत यांचे मिश्रण पॉलिथीलीन पिशव्यांमध्ये भरणे व आदेशानुसार भरलेल्या पिशव्या चौथऱ्यावर मांडणे (फक्त मजूरीचा खर्च) | | | |
| | (अ) १० x २० | प्रती १०० पिशव्या करिता | २८.४३ | २४.६६ |
| | (ब) १२.५० x २५ | | ३५.५१ | ३०.९४ |
| | (क) २५ x ३५ | | ५६.७४ | ४९.३२ |
| | (ड) ३५ x ४५ | | ७०.९० | ६१.६५ |
| २५ | दाखविल्याप्रमाणे पॉलिथिलीन पिशव्यांमध्ये बी पेरणे (बियाणांची किमत यामध्ये अंतर्भूत नाही) | प्रती १०० पिशव्या करिता | १३.३६ | ११.६५ |
| २६ | छोटया पॉलीथीलीन पिशव्यामधील रोपे मोठया पिशव्यामध्ये बदली करणे. | प्रती १०० पिशव्या करिता | ४२.४७ | ३६.९१ |
| २७ | उचित प्रकारे गोळा केलेल्या काटेरी झुडपापासून निर्देश दिल्याप्रमाणे १.२० मीटर उंचीचे काटेरी कुंपण घालणे आवश्यकता भासल्यास आधार देणे. | प्रती मीटर | ५.१४ | ४.३४ |
| २८ | बैलगाडी भाडयाने घेण्याचा खर्च यामध्ये दोन ड्रमसह बैलगाडी, गाडीवाहक व बैलजोडी यांचा समावेश आहे. | प्रतीदिन | ५०७.५० | ४४२.३१ |
| २९ | जमीनीमध्ये ३० सें.मी. x ३० सें.मी. x ३० सें.मी. आकाराचे खालील भूस्तरात खोदकाम करुन वृक्ष लागवडीकरीता निर्देशानुसार खड्डे खोदणे. | | | |
| | (अ) माती / मऊ मुरुमात | घनमीटर | ८२.३२ | ७१.५९ |
| | (ब) कठीण मरुमात | घनमीटर | १११.५५ | ९७.०५ |
| ३० | बाब क्र. २९ नुसार तयार करण्यात आलेली खड्डे वृक्ष लागवडीकरीता सुपिक माती भरणे. | प्रती खड्डा | १.४५ | १.२६ |
| ३१ | वृक्ष लागवडीकरीता खोदलेले खड्डे सुपीक मातीने भरणेसाठी, मातीत खोदकाम करणे व माती १० मी. अंतरापर्यंत त्यासाठी वाहून आणणे. | घनमीटर | ७०.९० | ६१.६५ |
| ३२ | कामाच्या ठिकाणी भुपृष्ठावर अथवा आधिच खोदकाम करण्यात आलेल्या क्षेत्रातुन उपलब्ध झालेल्या १५ कि.ग्रॅ. ते २० कि.ग्रॅ. वजनाचे शुष्क डबरापासून / दगडापासून १५ सें.मी. ते २३ सें.मी. जाडीचे पृष्ठावरण (Dry Pitching) तयार करणेसाठी डबराची / दगडाची हस्तरचीत संरचना करणे व त्यातील पोकळया (Voids) दगडी चिपांनी भरणे (यामध्ये दगड / चिपांच्या किमतीचा अंतर्भाव नाही). | चौ.मीटर | ६५.३१ | ५६.७४ |
| ३३ | दगडाच्या खाणीच्या ठिकाणी भुपृष्ठावर सुरुंग न लावता खोदकाम करुन मोठया आकाराचे दगड १५ कि.ग्रॅ. ते २० कि.ग्रॅ. वजनाचे काढण्यासाठी आवश्यक खोदकाम करणे व त्याची १० मी. अंतरापर्यंत व १.५ मी. उंचीपर्यंत वाहतूक करणे व अशा डबरापासून / दगडापासून १५ सें.मी. ते २३ सें.मी. जाडीचे शुष्क पृष्ठावरण (Dry Pitching) तयार करणेसाठी डबराची / दगडाची हस्तरचीत संरचना करणे व त्यातील पोकळया (Voids) दगडी चिपानी भरणे. | चौ.मीटर | ९२.२५ | ८०.१५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४ | जलरोधक खंदक (CUT OFF TRENCH) किंवा मातीचे भरावातील (EARTH WORK) गाभा क्षेत्राचे (HEARTING ZONE) वा एकाच मातीत मातीभराव (Mono Zone) करावयाचा असल्यास (पुर्ण उपखोरे-खोरपाणपट्ट्यातील कामे) त्याचे बांधकाम करण्यासाठी विशिष्ट निवड केलेल्या पदग्रहण क्षेत्रात योग्य दर्जाच्या मातीत खोदकाम करुन निघालेली सामग्री १० मी. वहन अंतरापर्यंत व १.५ मी. उंचीपर्यंत वाहून नेणे व ती ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थरावरात व्यवस्थित पसरविणे, उद्ग्रहण क्षेत्रातून आलेली झाडांची मुळे काढून बाहेर फेकणे, मातीचे ढेकळे फोडणे व मातीचा थर योग्य पातळीत संस्करण (Dressing) करणे. [जलशिंपण व रोलरव्दारे भरावाचे विनिर्दिष्टानुसार सघनन करणे (Watering and Compaction) ही कुशल बाब म्हणून समजण्यात यावी व याचा अंतर्भाव येथील बाबीत केलेला नाही. पाटबंधारे खात्याच्या दरसूचिनुसार यासाठी अतिरिक्त दर जोडण्यात यावा.] | घनमीटर | ७७.९८ | ६७.१३ |
| ३५ | मातीचे भरावातील (EARTH WORK) आवरण क्षेत्राचे (CASING ZONE) बांधकाम करण्यासाठी विशिष्ठ निवड केलेल्या उद्ग्रहण क्षेत्रात खालील योग्य दर्जाच्या भुस्तरात खोदकाम करुन निघालेली सामग्री १० मी. वहन अंतरापर्यंत व १.५ मी. उंचीपर्यंत वाहून नेणे व ती ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थरावरात व्यवस्थित पसरविणे, पदग्रहण क्षेत्रातून आलेली झाडांची मुळे काढून बाहेर फेकणे, ढेकळे फोडणे व सामग्रीचा थर योग्य पातळीत संस्करण (Dressing) करणे. (जलशिंपण व रोलरव्दारे भरावाचे विनिर्दिष्टानुसार सघनन करणे (Watering and Compaction) ही कुशल बाब म्हणून समजण्यात यावी व याचा अंतर्भाव केलेला नाही. पाटबंधारे खात्याच्या दरसूचिनुसार यासाठी अतिरीक्त दर जोडण्यात यावा.) | | | |
| | (अ) मऊ मुरुमाद्वारे | घनमीटर | ९५.९९ | ८३.३५ |
| | (ब) कठीण मुरुमाद्वारे | घनमीटर | १२०.११ | १०४.३५ |
| ३६ | रस्त्याच्या भरावाचे बांधकाम करण्यासाठी (EARTH WORK) उद्ग्रहण क्षेत्रात खालील योग्य दर्जाच्या भुस्तरात खोदकाम करुन निघालेली सामग्री १० मी.वहन अंतरापर्यंत व १.५ मी. उंचीपर्यंत वाहून नेणे व ती ३० सें.मी. जाडीपर्यंतच्या थरावरात व्यवस्थित पसरविणे, उद्ग्रहण क्षेत्रातून आलेली झाडांची मुळे काढून बाहेर फेकणे, ढेकळे फोडणे व सामग्रीचा थर योग्य पातळीत (Camber, Grade, Super elevation and proper section) आणण्यासाठी संस्करण (Dressing) करणे. [जलशिंपण व रोलरव्दारे भरावाचे विनिर्दिष्टानुसार सघनन करणे (Watering and Compaction) ही कुशल बाब म्हणून समजण्यात यावी व याचा अंतर्भाव केलेला नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसूचिनुसार यासाठी अतिरीक्त दर जोडण्यात यावा.] | | | |
| | (अ) मातीद्वारे | घनमीटर | ७७.९८ | ६७.१३ |
| | (ब) मऊ मुरुमाद्वारे | घनमीटर | ९५.९९ | ८३.३५ |
| | (ग) कठीण मुरुमाद्वारे | घनमीटर | १२०.११ | १०४.३५ |
| ३७ | दगडाच्या खाणीच्या ठिकाणी अथवा रस्त्याच्या कडेला आधिच सुरुंग लाऊन व तुकडे करुन उपलब्ध करुन दिलेल्या साधारणत: २० सें.मी. ते ३० सें.मी. आकाराच्या दगडांपासून/धोंडयांपासून ८० मि.मी. ते १०० मि.मी. आकाराची खडी तयार करणे व तिचा जागेवर ढीग करणे किंवा परेत भरणे [यामध्ये खाणीच्या ठिकाणी सुरुंग लावणे व उडविणे, मोठ्या दगडाचे तुकडे करणे (Expenses of drilling, blasting and secondary breaking are not included) यावरील खर्चाचा अंतर्भाव नाही]. | प्र.घ.मी. | १४०.४३ | १२२.०५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३८ | दगडाच्या खाणीच्या ठिकाणी अथवा रस्त्याच्या कडेला अधिच सुरुंग लावून व तुकडे करुन उपलब्ध करुन दिलेल्या साधारणत: २० सें.मी. ते ३० सें.मी. आकाराच्या दगडांपासुन /धोंड्यांपासून ४० मि.मी. ते ६० मि.मी. आकाराची खडी तयार करणे व तिचा जागेवर ढीग करणे किंवा फरेत भरणे [यामध्ये खाणीच्या ठिकाणी सुरुंग लावणे व उडविणे, मोठ्या दगडाचे तुकडे करणे (Expenses of drilling, blasting and secondary breaking are not included) यावरील खर्चाचा अंतर्भाव नाही]. | प्र.घ.मी. | १८७.०२ | १६२.७० |
| ३९ | दगडाच्या खाणीच्या ठिकाणी अथवा रस्त्याच्या कडेला भुपृष्ठभागावरील उपलब्ध असलेले मोठया आकाराचे दगड / धोंडे गोळा करणे व त्यासाठी आवश्यकता असल्यास जमिनीत आवश्यक ते खोदकाम करणे व अशी दगड / धोंडे गोळा करुन (सुरुंग न लावता ) त्यापासून ८० मि.मी. ते १०० मि.मी. आकाराची खडी तयार करणे व तिचा जागेवर ढीग करणे किंवा फरेत भरणे. | प्र.घ.मी. | ३४३.०९ | २९८.२२ |
| ४० | दगडाच्या खाणीच्या ठिकाणी अथवा रस्त्याच्या कडेला भुपृष्ठभागावरील उपलब्ध असलेले मोठया आकाराचे दगड / धोंडे गोळा करणे व त्यासाठी आवश्यकता असल्यास जमिनीत आवश्यक ते खोदकाम करणे व अशी दगड / धोंडे गोळा करुन (सुरुंग न लावता) त्यापासून ४० मि.मी. ते ६० मि.मी. आकाराची खडी तयार करणे व तिचा जागेवर ढीग करणे किंवा फरेत भरणे. | प्र.घ.मी. | ३८९.९० | ३३८.९८ |
| ४१ | सर्व आकाराची खडी ढिगापासून वाहून नेणे, पसरविणे / आथरणे व त्याचे छेदन / संस्करण करणे इत्यादी सर्व कामे करणे. | प्र.घ.मी. | ३५.५१ | ३०.९४ |

<u>**जोडपत्र दोन**</u>

राज्यातील आदिवासी जनजाती उपाययोजना अंतर्गतचे क्षेत्र दर्शविणारे विवरणपत्र
(शा.नि. आ.वि.वि. क्र.टिएसपी-१०८६/८७१०/प्र.न.३१/का.५, दि.९.३.१९९० च्या जोडपत्र १ व २ प्रमाणे)

| अनु. क्रमांक | जिल्हा | जनजाती/आदिवासी पूर्ण समाविष्ट तालुके | उपयोजना तालुके अंशतः समाविष्ट तालुके |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | ठाणे | (१) डहाणू<br>(२) तलासरी<br>(३) मोखाडा<br>(४) जव्हार<br>(५) वाडा<br>(६) शहापूर | (१) पालघर<br>(२) वसई<br>(३) भिवंडी<br>(४) मुरबाड |
| २ | रायगड | -- | (१) कर्जत |
| ३ | नाशिक | (१) कळवण<br>(२) सुरगाणा<br>(३) पेठ<br>(४) त्र्यंबकेश्वर | (१) बागलाण<br>(२) दिंडोरी<br>(३) इगतपुरी<br>(४) नाशिक<br>(५) देवळा |
| ४ | नंदुरबार | (१) तळोदा<br>(२) अक्राणी (धडगाव)<br>(३) अक्कलकुवा<br>(४) नवापूर | (१) शहादा<br>(२) नंदुरबार |
| ५ | धुळे | -- | (१) साक्री<br>(२) शिरपूर |
| ६ | जळगांव | -- | (१) चोपडा<br>(२) यावल<br>(३) रावेर |
| ७ | अहमदनगर | -- | (१) अकोले |
| ८ | पुणे | -- | (१) जुन्नर<br>(२) आंबेगाव<br>(३) खेड |
| ९ | नांदेड | -- | (१) किनवट |
| १० | अमरावती | (१) धारणी<br>(२) चिखलदरा | --<br>-- |
| ११ | नागपूर | -- | (१) रामटेक<br>(2) |
| १२ | गोंदिया | -- | (१) सालेकसा<br>(२) अर्जुनी मोरगाव<br>(३) देवरी<br>(४) सडक अर्जुनी |

| अनु-क्रमांक | जिल्हा | जनजाती/आदिवासी पूर्ण समाविष्ट तालुके | उपयोजना तालुके अंशत: समाविष्ट तालुके |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १३ | यवतमाळ | -- | (१) मारेगाव<br>(२) राळेगाव<br>(३) केळापूर<br>(४) घाटंजी<br>(५) यवतमाळ<br>(६) बाभूळगाव<br>(७) कळंब<br>(८) पुसद<br>(९) महागाव<br>(१०) उमरखेड<br>(११) झरी जामणी<br>(१२) आर्णि<br>(१३) वणी |
| १४ | गडचिरोली | (१) सिरोंचा<br>(२) अहेरी<br>(३) एटापल्ली<br>(४) धानोरा<br>(५) कुरखेडा<br>(६) भामरागड<br>(७) कोरची | (१) गडचिरोली<br>(२) आरमोरी<br>(३) चामोर्शी<br>(४) देसाईगंज<br>(५) मुलचेरा |
| १५ | चंद्रपूर | ..... | (१) राजुरा<br>(२) गोंडपिंपरी<br>(३) मूल<br>(४) चंद्रपूर<br>(५) नागभिड<br>(६) सिंदेवाही<br>(७) ब्रम्हपुरी<br>(८) चिमूर<br>(९) वरोरा<br>(१०) भद्रावती<br>(११) कोरपणा<br>(१२) सावळी<br>(१३) पोंभुर्णा |

(शासन निर्णय, नियोजन विभाग, क्र. डोंविका-२००९/प्र.क्र.६/कार्यासन-१४८३, दि. १८जानेवारी, २०१०चे सहपत्र )

## जोडपत्र-तीन

## राज्यातील डोंगरी विभागाचे क्षेत्र दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | ठाणे | १) मोखाडा | पूर्ण गट (१) | |
| | | २) शहापूर | पूर्ण गट (२) | |
| | | ३) जव्हार | पूर्ण गट (३) | |
| | | ४) वाडा | पूर्ण गट (४) | |
| | | ५) मुरबाड | पूर्ण गट (५) | |
| | | ६) वसई | | उप गट (१) |
| | | ७) भिवंडी | | उपगट (२) |
| | एकूण | | ५ | २ |
| २ | रायगड | ८) तळा | पूर्ण गट (६) | |
| | | ९) खालापूर | पूर्ण गट (७) | |
| | | १०) महाड | पूर्ण गट (८) | |
| | | ११) पोलादपूर | पूर्ण गट (९) | |
| | | १२) रोहा | पूर्ण गट(१०) | |
| | | १३) सुधागड | पूर्ण गट (११) | |
| | | १४) म्हसाळा | पूर्ण गट(१२) | |
| | | १५) पेण | पूर्ण गट(१३) | |
| | | १६) मुरुड | पूर्ण गट(१४) | |
| | | १७)कर्जत | पूर्ण गट (१५) | |
| | | १८) माणगांव | पूर्ण गट (१६) | |
| | | १९) पनवेल | | उप गट (३) |
| | एकूण | | ११ | १ |
| ३ | रत्नागिरी | २०) संगमेश्वर | पूर्ण गट (१७) | |
| | | २१)चिपळूण | पूर्ण गट (१८) | |
| | | २२) लांजा | पूर्ण गट (१९) | |
| | | २३)खेड | पूर्ण गट (२०) | |
| | | २४) राजापूर | पूर्ण गट (२१) | |
| | | २५) मंडणगड | | उप गट (४) |
| | एकूण | | ५ | १ |
| ४ | सिंधुदुर्ग | २६) कुडाळ | पूर्ण गट (२२) | |
| | | २७)कणकवली | पूर्ण गट (२३) | |
| | | २८) वैभववाडी | पूर्ण गट (२४) | |
| | | २९)सावंतवाडी | पूर्ण गट (२५) | |
| | | ३०) देवगड | पूर्ण गट (२६) | |
| | | ३१)मालवण | | उप गट ( ५) |
| | एकूण | | ५ | १ |
| ५ | नाशिक | ३२) सुरगाणा | पूर्ण गट (२७) | |
| | | ३३) कळवण | पूर्ण गट (२८) | |
| | | ३४) पेठ | पूर्ण गट (२९) | |

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| | | ३५) इगतपुरी<br>३६)बागलाण<br>३७)सिन्नर<br>३८)नाशिक<br>३९) दिंडोरी | पूर्ण गट (३०)<br>पूर्ण गट (३१)<br>पूर्ण गट (३२)<br>पूर्ण गट (३३)<br>पूर्ण गट (३४) | |
| | एकूण | | ८ | ० |
| ६ | धुळे | ४०) शिरपूर<br>४१) साक्री | पूर्ण गट (३५)<br>पूर्ण गट (३६) | |
| | एकूण | | २ | ० |
| ७ | नंदुरबार | ४२)अक्राणी<br>४३)अक्कलकुवा<br>४४) नवापूर<br>४५) तळोदा<br>४६) शहादा | पूर्ण गट (३७)<br>पूर्ण गट (३८)<br>पूर्ण गट (३९) | उप गट (६)<br>उप गट (७) |
| | एकूण | | ३ | २ |
| ८ | जळगांव | ४७) यावल<br>४८) रावेर<br>४९) चोपडा<br>५०) एदलाबाद | | उप गट (८)<br>उप गट (९)<br>उप गट (१०)<br>उप गट (११) |
| | एकूण | | ० | ४ |
| ९ | अहमदनगर | ५१) अकोले<br>५२) संगमनेर<br>५३) अहमदनगर<br>५४) पारनेर<br>५५) पाथर्डी | पूर्ण गट (४०)<br>पूर्ण गट (४१) | उप गट (१२)<br>उप गट (१३)<br>उप गट (१४) |
| | एकूण | | २ | ३ |
| १० | पुणे | ५६) खेड<br>५७) आंबेगांव<br>५८) मुळशी<br>५९) भोर<br>६०) मावळ<br>६१) पुरंदर (सासवड)<br>६२) वेल्हे<br>६३) जुन्नर<br>६४) हवेली | पूर्ण गट (४२)<br>पूर्ण गट (४३)<br>पूर्ण गट (४४)<br>पूर्ण गट (४५)<br>पूर्ण गट (४६)<br>पूर्ण गट (४७)<br>पूर्ण गट (४८)<br>पूर्ण गट (४९<br>पूर्ण गट (५०) | |
| | एकूण | | ९ | ० |
| ११ | सांगली | ६५) शिराळा<br>६६) खानापूर<br>६७) कडेगांव | पूर्ण गट (५१) | उप गट (१५)<br>उप गट (१६) |
| | एकूण | | १ | २ |
| १२ | सातारा | ६८) जावळी<br>६९) महाबळेश्वर<br>७०) पाटण<br>७१) सातारा<br>७२) वाई<br>७३) कोरेगांव | पूर्ण गट (५२)<br>पूर्ण गट (५३)<br>पूर्ण गट (५४)<br>पूर्ण गट (५५)<br>पूर्ण गट (५६)<br>पूर्ण गट (५७) | |

| अ.क्र | जिल्हा | डोंगरी तालुका | पूर्ण गट | उप गट |
|---|---|---|---|---|
| | | ७४) खटाव<br>७५) खंडाळा<br>७६) माण<br>७७) फलटण<br>७८) कराड | पूर्ण गट (५८)<br>पूर्ण गट (५९) | उप गट (१७)<br>उप गट (१८)<br>उप गट (१९) |
| | एकूण | | ८ | ३ |
| १३ | कोल्हापूर | ७९) शाहुवाडी<br>८०) गगनबावडा<br>८१) राधानगरी<br>८२) भुदरगड<br>८३) पन्हाळा<br>८४) करवीर<br>८५) कागल<br>८६) चंदगड<br>८७) आजरा<br>८८) गडहिंग्लज | पूर्ण गट (६०)<br>पूर्ण गट (६१)<br>पूर्ण गट (६२)<br>पूर्ण गट (६३)<br>पूर्ण गट (६४)<br>पूर्ण गट (६५)<br>पूर्ण गट (६६)<br>पूर्ण गट (६७)<br>पूर्ण गट (६८)<br>पूर्ण गट (६९) | |
| | एकूण | | १० | ० |
| १४ | औरंगाबाद | ८९) सोयगांव<br>९०) सिल्लोड<br>९१) खुलताबाद<br>९२) कन्नड | पूर्ण गट (७०) | उप गट (२०)<br>उप गट (२१)<br>उप गट (२२) |
| | एकूण | | १ | ३ |
| १५ | बीड | ९३)आष्टी<br>९४)पाटोदा<br>९५)परळी-वैजनाथ<br>९६)केज<br>९७)बीड<br>९८)आंबेजोगाई<br>९९) धारुर | | उप गट (२३)<br>उपगट (२४)<br>उप गट (२५)<br>उप गट (२६)<br>उप गट (२७)<br>उप गट (२८)<br>उप गट (२९) |
| | एकूण | | ० | ७ |
| १६ | हिंगोली | १००)हिंगोली<br>१०१)कळमनुरी | | उप गट (३०)<br>उप गट (३१) |
| | एकूण | | ० | २ |
| १७ | नांदेड | १०२) किनवट | पूर्ण गट (७१) | |
| | एकूण | | १ | ० |
| १८ | बुलढाणा | १०३) खामगांव | | उप गट (३२) |
| | एकूण | | ० | १ |
| १९ | अकोला | १०४)पातूर | | उप गट(३३) |
| | एकूण | | ० | १ |
| २० | अमरावती | १०५) चिखलदरा<br>१०६) धारणी | पूर्ण गट (७२)<br>पूर्ण गट (७३) | |
| | एकूण | | २ | ० |
| २१ | यवतमाळ | १०७)पुसद<br>१०८)उमरखेड | | उप गट (३४)<br>उप गट (३५) |
| | एकूण | | ० | २ |
| | **एकूण २१ जिल्हे** | | **७३** | **३५** |

उपगट म्हणून घोषित केलेल्या डोंगरी तालुक्यातील गावांची यादी

| अ. क्र. | जिल्हा | उपगट म्हणून घोषित केलेला डोंगरी तालुका | उपगट तालुक्यातील गावांची नांवे |
|---|---|---|---|
| कोकण विभाग | | | |
| १. | ठाणे | १) वसई | १) चांदीप २) तिपलीया ३) शिवनसई ४) पानसा ५) उसगांवश ६) परोळ ७) शिरवली ८) नळकोया ९) सायवन १०) घाटेघर ११) भावखल १२) पेल्हार १३) माजिवली १४) देपिवली १५) करझोण १६) खानिवडे १७) भिन्नार १८) खोलसट १९) खैरपाडा २०) सुंदरा २१) बुडाल २२) तिल्हेर २३) सावट २४) गुरतारी २५) बिलालपाडा २६) गया २७) दडविरा २८) सातीवली २९) खर्डी ३०) देडा ३१) डोलीव ३२) बामन ३३) कानू ३४) कोल्ही ३५) कोळा ३६) चिचोटी ३७) होवाळन |
| | | २) भिवंडी | १) गणेशपुरी २) चडवली ३) उसगांव ४) घोडगांव ५) आंबीपाडा ६) घोटाडे ७) मोहिली ८) बावचा ९) मालादियार १०) देपोली ११)उसपाडी पाडा १२) आंबराईपाडा १३) ध्यार १४) खडकी खुर्द १५) पिंपळवेल १६) खडकी बुद्रुक १७) भाउपोळ १८) गुहापाडा १९) कुस २०) आंबापाडा २१) देपपाडा २२) माजरपाडा २३) थामणे २४) वरणापाडा २५) पेंडरीपाडा २६) नवावाडा २७) थाऊरपाडा २८) धुलईपाडा २९) पायगांव ३०) पाया ३१)खडीपाडा ३२) पैरनपाडा ३३) भावाडीपाडा ३४) खारवांव ३५)गाणे ३६)लाखिवली ३७)चिंबीपाडा ३८)गोरीपाडा ३९)डोकरनापाडा ४०)अलकोअरी |
| २. | रायगड | ३) पनवेल | १) माणिकघर २) चौडसावना ३) सावना ४) वामणोरी ५) जाम्हदेवी ६) देवलोळी ७) छावना ८) कालेवली ९) सारसाई १०) आपटा ११) कासप १२) कारडा १३) देवटी १४) गुलसुंडा १५) अकुबडी १६) धुराडाव १७) वावेघर १८) कोष्टी १९) दापोवली २०) देवतुली २१) सावला २२) करनाडा २३) कला २४) वंडाना २५) कारल २६) दुलघट २७) कातरभाट २८) दिघारी २९) हातवंडी |
| ३. | रत्नागिरी | ४) मंडणगड | १) आंबवणे बुद्रुक २) किंजळघर ३) पेवे ४) पणदेरी ५) पडवे ६) उंबरशेत ७) वेरळ तर्फे वेश्वी ८) तेर्डी ९) लोकरण १०) म्हाप्रळ ११) अडखळनेव १२) कुंभार्ली १३) गोवळे १४) पन्हळी खुर्द १५) बुरी १६) टाकवली १७) टांगर १८) सुर्ली १९) आडखल २०) वेश्वी २१) पाट २२)शेनाळे २३) सोवेली तर्फे वेश्वी २४) कुडूकखुर्द २५) शिरगांव २६) धुत्रोली २७) सडे २८) तळेघर २९) टाकेड ३०) पाचरळ ३१) धामणी ३२) बोरखत ३३) गोटे ३४) भामघर ३५) सावरी ३६) निगडी |
| ४. | सिंधुदूर्ग | ५) मालवण | १) कुल्लोस २) असरोंडी ३) भवानी ४) कंजकर ५) टायरभाव ६) भाटपावणी ७) मिरवडे ८) राटीवडे ९) आजगणी १०) ब्राम्हण ११) हिवाळे १२) आवलीचे १३) खोटले १४) हेडूल १५) थायंनगावडे १६) वायरन १७) पोईप १८) नेसुरे १९) वाडेच्या पाट २०) नवापाट २१) गोलवण २२) डिकवळ २३) चापेखोल २४) कुमामे २५) नांदोस २६) तिरावडे २७) पारस २८) हेडूल. |
| नाशिक विभाग | | | |
| ५. | नंदूरबार | ६) तळोदा | १) सोजुरवाडा २) माळखुर्द ३) चोगांव खुर्द ४) लाकुड शेट ५) खर्डी खुर्द |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६) काठोर ७) बंधारा ८) खर्डी बुद्रुक ९) जुवाणी १०) लाखापूर ११) माळ १२) मोरामाळ १३) आंबा गव्हाण १४) सीतपावळी १५) बामनी १६) मलुवा १७) राजापूर |
| | | ७) शहादा | १) काकरद खुर्द २) कनकरदे बुद्रुक ३) कोंढावळ ४) चांदसेली ५) चिरडे ६) वरुड बुद्रुक ७) मळगांव ८) भुलाना ९) दरा १०) राणीपूर ११) आकसपूर १२) मानमोडया १३) नागझरी १४) लंगडी भवसनी १५) शहाना १६) खापरखेडे १७) आमाणपूर खुर्द १८)टरवा १९) नायगांव २०) सिसुरा २१) पेचा २२) फोफराळे २३) चांदपूर २४) गुधा २५) इकरास २६) काटघर २७) पिरपूर |
| ६. | जळगांव | ८) यावल | १) मनुबाई देवस्थान २) लंगडया आंबा ३) गढ्-या ४) जामन्या ५) उसमळी ६) हरीपुरा ७) नागदेवी ८) वाघझीर ९) आसरा बारी |
| | | ९) रावेर | १) लिडया २) अंधारमळी ३) मोहमोंडी ४) चिंचाटी ५)निमडया ६)गारखेडा ७)मोहमांडली<br>सून ८) पिंपट कुंड ९) पाल १०) मोरव्हाल ११) जिन्सी १२) गारखेडी १३) सहस्त्रलिंग १४) लालमाती |
| | | १०) चोपडा | १) मराठा २) सत्रासेन ३) खांडरा ४) भोरचिडा ५) उमरटी ६) गोयापाडा ७) कृष्णापूर ८) खा-यापाडा ९) विजापूर १०) मुढयावतार ११) शेतपाणी १२) बोरअजंती १३)मालापूर १४) विष्णापूर १५) बोरमळी १६) कर्जाणा १७) मेलाना १८) देव्हारी |
| | | ११)एदलाबाद | १) दुई २) सुकली ३) सोमणगांव ४) डोलरखेडा ५) नोंदवेल ६)वायल ७) चारठाणे ८)देवी मंदीर<br>९) मारझिरा १०) जोधन खेडा ११) लालगोंडा १२) हुलखेडा |
| ७. | अहमदनगर | १२)अहमदनगर | आगडगांव, देवगांव, रतडगांव, बारदरी, मेहकरी, माळेवाडी, मायणी, रांजणी, खांडके, पिंपळगावकवडा, भोयरेखुर्द, कौडेगांव, सोनेवाडी, पिंपळगांव, उजनी, भोयरेपठार. |
| | | १३)पारनेर | चिंचोली, शेरी-कोलदरा, दरोडी, नांदुरपठार, सावरगांव, कारेगांव, निखोल, पांढळी-दर्या, जाधववाडी, शहाजापूर. |
| | | १४) पाथर्डी | चेकेवाडी, माणिक दौंडी, पिरेवाडी, बोरसेवाडी, आलहणवाडी, मोहरी, करोडी, चिचंपूर-पांगुळ, ढाकणवाडी |
| | | पुणे विभाग | |
| ८. | सांगली | १५)खानापूर | देविखिंडी ,रेणावी, वारुंबे,कुर्ली,पारे |
| | | १६)कडेगांव | कोतवडे,सोनसळे,सिरसगांव,सोनकिर |
| ९. | सातारा | १७) माण | कुळकजाई २) कळसकर वाडी ३) गाडेवाडी ४) शिंदी बुद्रुक ५) पाळवण ६) तोंडले ७) उगळेवाडी ८) खंडयाची वाडी ९) मोगराळे १०) शिंगणापूर ११) भाडळी १२) इंजबाव १३) काळचौंडी १४) विरळी १५) वळई १६) कुक्कडवाड १७) मस्कणे १८) काळेवाडी १९) दोरगे वाडी २०)किरकसाड २१) महिमानगड २२) दिवडी २३) पांढरवाडी २४) स्वरुपखानवाडी २५) ढाकरडे २६) शिंदी बुद्रुक २७) बोंथे |
| | | १८)फलटण | १) सालपे २) आदर्कीखुर्द ३) आळजापूर ४) कोराळे ५) वाघोशी ६) लाथवडा ७)मानेवाडी ८) झडकबाईवाडी ९) वेलोशी १०) उपळवे ११) दालवडी १२) मीरेवाडी १३) गिरवी १४) धुमाळवाडी १५) बेडकेवाडी १६) सासकळ १७) भाडळी खुर्द १८) दुधेभावी १९) मीरदे २०) जावली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | २१) आडुड २२) कुरवाली बु. |
| | | १९) कराड | १) मरळी २) चोरजवाडी ३) कोरीवळे ४) बेलदरे ५) म्होप्रे ६) भोळेवाडी ७) साकुर्डी ८) येणके ९) कोळे १०) कुसुर ११) तुळसण १२) सवादे १३) लाटकेवाडी १४) हवेलवाडी १५) म्हासोळी १६) शेवाळेवाडी १७) शेळकेवाडी १८) मनू १९) येवती २०) घराळवाडी २१) हणमंतवाडी २२) टाळगांव २३) येळगांव २४) गोरेवाडी २५) गणेशवाडी २६) भरेवाडी २७) साळशिरमे २८) महारुगडेवाडी २९) जीती ३०)अक्काईवाडी ३१)कासारशिरभे ३२) निगडी ३३)घोलपवाडी ३४) किवळ ३५) खेडताईवाडी ३६) मसूर ३७)हणबरवाडी ३८) वाण्याची वाडी ३९) मालवाडी ४०)कांबीरवाडी ४१) शिरगांव ४२) सुळी ४३) पाल ४४)हरपळवाडी ४५) रिसवड ४६) वरती साकुर्डी ४७)सांजूर ४८) तांबवे ४९) आरेवाडी ५०) गमेवाडी ५१)माळवाडी ५२) डोळेवाडी ५३) पांढरवाडी ५४) आणे ५५)अंबवडे ५६) तारुख ५७) वामन वाडी ५८) वानरवाडी ५९) उंडाळे ६०) मूरभूशी ६१) जखीनवाडी ६२) नांदलापूर ६३)वनवासमाची ६४) वसंतगड ६५) चरेगांव ६६)भवानपाडा ६७) शिललवाडी ६८) चिरवली ६९) पाचुंद ७०) कामथी ७१) वाघेरी ७२) करवडी ७३) हजारमाची ७४) बाबरमाची ७५) वनवासमाची ७६) राजमाची ७७)टेंभू ७८) भयापूर ७९) कोरेगांव ८०) कार्वे ८१)वडगांव हवलेली ८२) शेणोली कालवडे ८३) घोगांव |
| औरंगाबाद विभाग | | | |
| १०. | औरंगाबाद | २०) सिल्लोड | १) धनशिंगवाडी २) बाभुळगांव ३) पोखरी ४) बाबरा ५)मोमीनाबाद ६)लेहा ७)बोधेगांव बु. ८) अंधारी ९) जातवा १०) उमरावती ११) घाटनांद्रा १२) परदेशीवाडी १३) चारनेर १४) वावडा १५) अंधारवाडी १६) कडेगांव १७) सिरसाम १८) नालेगांव १९) घाटमखळ २०) हालदा २१) पिंपळदरी २२) मुखवार २३) वाघरा २४) रांजणी २५) अजिंठा २६)अनाड २७) आमसरी २८) नारवी २९) वडाळी |
| | | २१) खुलताबाद | १) वडगांव २) पाडळी ३) शिरोळ ४) सावरखेडा ५) लोणी ६) बोडक ७) खुलताबाद ८) धामणगांव ९) अबदुलापूर १०) निरगुडी बु. ११) पिंपरी १२) जमालवाडी १३) म्हैसमाळ १४) शिरसमाळ १५) टाकळी खुर्द १६) आखतवाड १७)वेरुळ १८) मंत्रापूर १९)खुलताबाद २०) सराई २१)वाटलावाडी २२) नंद्राबाद २३) मापसाला २४) रसुलपूर २५)शंकरपूरवाडी २६) साबुखेडा २७) खिर्डी २८) सोनखेडा २९) भटजी ३०) लामनगांव ३१) खतेनापूर ३२) विरमगांव |
| | | २२) कन्नड | १) तांदुळवाडी २) पेंचली ३) मुंगसापूर ४) पेंकडवाडी ५) कोंडवाडी ६) कल्याणी ७) वडनेर ८) अंबाला ९) आंबा १०) जामडी ११) रेळ १२) कुंजखेड १३) नांदगिरवाडी १४)शिवरुखेडा १५) वडाळी १६) जेतखेडा १७) मालेगांव ठोकळ १८) भारंबा १९) मालेगांव लोखंडे २०) मोहाडी २१)हरसा २२) माहेगांव २३) देवूपूर २४) पळशी खुर्द २५)कालंबी मांजरा २६) भिलदरी २७) गोर पिंपरी २८)सवखेडा बु. २९) पिंपरखेडा ३०) सफीयाबाद३१)खडकी ३२) पिशोर ३३) खातखेडा ३४) वासडी ३५) निभोरा |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ३६)उमरखेड ३७) सावरगांव ३८) धामणी ३९)आंबेगांव बु. ४०) मेहुण ४१) हासेवाडी ४२) वडगांव ४३) लोझा ४४)पांगेरी ४५) बेलखेडा ४६) सोनवाडी ४७) शिवघाट ४८) चिमणापूर ४९) नागापूर ५०)करंजखेड ५१) रेडळगांव ५२) नेवपूर ५३) घाटशेंदा ५४) टाकळी अंतूर ५५)लोहगांव ५६) नायगांव ५७)तपोवन ५८)कान्हेगांव ५९) हिवरा ६०)दुधमाळ६१) तळनेर ६२) वडोद ६३) मोहर्डा ६४)वजीर वाडी (मोहर्डा गावाखालील वाडी) |
| ११. | बीड | २३) आष्टी | देऊळगाव घाट, चिंचवाडी, आरणविहिर, कारखेलखुर्द, वेलतुरी, शेडाळे, मसुबाची वाडी, महिंद्र, पांग्रा, पिंपरी (नजीक घाट) |
| | | २४) पाटोदा | निरगुडी, वडझरी, रोहतवाडी, डोमरी |
| | | २५) परळी (वैजनाथ) | सरफराजपूर, गर्देवाडी, कन्हेरवाडी, मोहा, बोधेगांव, सोनहिवरा, अस्वलंबा, वानटाकळी, दौनापूर , डाभो, इदरवाडी, कनेरवाडी, भोपला, देवाडा |
| | | २६) केज | तळनेरी, नागझरी, जिवाची वाडी, घाटेवाडी, तूळूची वाडी, कोरडयाची वाडी, गोरवाडी, पराची वाडी |
| | | २७) बीड | हिवरा-पहाडी, बोरखेडी, वांगी, कोल्हारवाडी, अहेरवाडी, करझणी, धनगरवाडी, चराटा, मैंगळेवाडी, जाधववाडी, नागझरी, पाटोदा, (बेलखंडी) कचारवाडी, खंडाळा |
| | | २८) आंबेजोगाई | चिंचखंडी, राक्षसवाडी, ममदापूर ( परळी ), एल्डा, मांडवा (पठाण ) काळवटी ( लमानतांडा ) साकूड, अंबलवाडी |
| | | २९) धारुर | चिखलबीड, खडकी, टोकवाडी, पिंपळा, मैदवाडी, चोरांबा, मोहा ( जहागीर), काटेवाडी, भोगलवाडी, मोहखेड, आमला, कोयाड. |
| १२. | हिंगोली | ३०) हिंगोली | नरसी २) लोहगां ३) सेवली ४) पिंपळा ५) बोरळा ६)जळगांव ७)शेलेगांव ८)सोनेगांव ९) पिंपरखेड १०)देवळा ११) अनपनवाडी १२) सुकापूर १३) माथा १४)मुर्लिजापूर १५) केहरपिंपरी १६)सिध्देश्वर १७)दिग्रुळ १८)दुडयुना १९)बडचुन २०) आडी २१) हनुमानदरी २२)शिवकार २३)जामला २४) जामदन २५)वैनापूर २६)खंबाळा २७)कासोले २८) तवलीगव्हाण २९) मांडेगांव ३०) राख ३१)जामरी खुर्द ३२)पांगरी ३३) बोराळा ३४)नांदुरा ३५)कडती ३६) आमनखेड ३७) ब्रम्हपुरी ३८)खळगांव ३९) जामसन ४०) पारडी ४१) खळगांव ४२)रिधोस ४३)संजगांव ४४) कोळंब ४५) सुकली बु. ४६)सुकली खु. ४७) शिंदेफळ ४८)धनगरवाडी ४९)सवळखेड ५०)बाभुळगांव ५१) गोरेगांव ५२) पोंडीखुर्द५३)ब्राम्हणवाडी ५४) पिंपरी पाथवळ ५५) बोरखेड ५६)एकंबा ५७) खंडळा ५८)चिंचोळी ५९) बेलुरा ६०)आडगांव ६१) देवठाण ६२)काळेगांव ६३) कलीखेड ६४) कळपकुर्ली ६५) चाटोना ६६) देवठाण |
| | | ३१) कळमनुरी | १) खेरडा २) धानापूर ३) धोतरा ४) अमरखोजा ५)शिरसखुर्द ६) शिरस बु. ७)डिग्रसवाणी ८) पिंपळी ९)सांडस १०) रेटकर ११) वराडी १२) खडकत बु. १३)खडकत खु. १४) मंदारी १५) गारखेडा १६) महारी खु-१७) खडकेत १८) बैज १९) दुधेरी २०)चिंचोळी २१)खोडतला २२) पेडगांव २३) डोंगी २४) नांदुरा २५)बोलावाडी २६) तळेगांव २७) जांब २८) निम्मते बु २९)वापर ३०) शिपणी ३१) माळवाडी ३२) वाडेगांव ३३)मोतीचोर ३४) विठ्ठलवाडी ३५)पिंपरी खु. ३६) कानेगांव ३७) फाटाणा ३८) वाभाडी ३९) पुंचा ४०) मारेगांव |
| १३. | बुलढाणा | ३२) खामगांव | १) गिरोळ २) इसालवाडी ३) चिंचखेडनाथ ४) कडेडगांव ५) चिंचखेडखंड |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | ६) शेंद्री ७)मांडणी ८) बोथा ९) खेर्डी १०)वाकी ११) गारखेड १२) गारोडी १३) धार १४) माटरगांव १५) चिचखेड १६) सारोळा १७) कोन्टी १८) चड्डर १९)पिंपरीधनगर २०) लाखनवाडी खुर्द २१) फत्तेपूर २२)निमखेडा २३) लाखनवाडी बुद्रुक २४) हिवरेखेड २५)निरोडा |
| १४. | अकोला | ३३) पातूर | १) अंबारी २) भानोसा ३) बेलताळ ४) मलकापूर ५) भांकद कंदोली ६) वडीआमराई ७) बोडसा ८) खानापूर ९)काकडदरी १०) कोठारी बुद्रुक ११) पासटल १२) कोसगांव १३) माळराजुरा १४) सावरखेड १५) चिंचखेड पातूर १६)शेकापूर १७) कार्ला १८) धारमुळी १९)धरम २०) पांढुर्णा २१) सोनुना २२) चिखलवाकळ २३) चौंडी २४) जांब २५)चिंचखेड २६) गोळेगांव २७) आथारसावंगी २८)गावडगांव २९) सावरगांव |
| १५. | यवतमाळ | ३४) पुसद | १) पिंपळगांव २) हौसापूर ३) बामनवाडी ४) का-होळ ५)गहूली ६) चौंडी ७) चिंचघाट ८) देवगव्हाण ९)बेलगव्हाण १०) जामनीधुंदी ११)मोरगड १२)उडवी १३)मारवा १४)पांढुणी (खुर्द) १५) खटकोला १६)पन्हाळा १७)मांजरजवळा (खुर्द) १८) मांजरजवळा(बु) १९)सावतमाळ २०) हनवंतखेड २१) मारवाडी २२)अमृतनगर २३) धनसळ २४) अनसळ२५) उपवनवाडी २६) रामपूरनगर २७) दुधगिरी २८)अनसिंग २९)जांबनाईकर ३०)शिलोना |
| | | ३५) उमरखेड | १) दिझाळा २) पार्डी ३) पिरंजी ४) गोविंदपूर ५) कुरळी ६)जाम ७) अकोली ८) सालाळा ९) मसळग १०) पार्डी ११)मेथळी १२) पिंपळगांव १३) बोडखा १४) पेंधा १५)उदापूर १६) सावरगांव १७) फरोटी खुर्द १८) नानी १९)बोरी २०) थेरडी २१) पवनाळा २२) सोनदाभी २३)येवंता २४) मोरचंडी २५) कोसंबी २६) चिखली २७)रोमपूर २८) बोरगांव २९) डोंगर गांव ३०) धक्षेली ३१)सोईर ३२) नवेलालपूर ३३) दिग्रस ३४)काओी ३५)कवठा ३६)दहेली ३७) धानोरा ३८) शिवाजीनगर ३९)मथराळा ४०) उमरी ४१) कसोली ४२) सेवालालनगर ४३) वडगांव ४४) दामसरी ४५) थार बु. ४६) सेरंडी ४७)दरारी ४८) मधुरानगर |

**जोडपत्र चार**

(सर्व कार्यान्वयीन यंत्रणेकरिता लागू)

ज्यांचे मोजमाप करता येत नाही अशा पुढील कामांसाठी विहित करण्यात आलेल्या दराप्रमाणे प्रतिदिन मजुरी द्यावी.

**उदाहरणार्थ :-**

(एक) सर्वेक्षणविषयक उपकरणाची ने-आण करण्यासाठी ती विशिष्ट ठिकाणी मांडण्यासाठी आणि संरेखन (अलाईनमेंट) इत्यादी कामांसाठी आवश्यक असलेले मजूर.

(दोन) स्त्री मजुरांना कामावर येताना कामाच्या ठिकाणी आणलेल्या आपल्या मुलांची देखभाल करण्यासाठी आवश्यक असलेले स्त्री मजूर.

(तीन) पहारेकरी.

(चार) साखळीने मोजणी करणे आणि साखळीच्या मोजणीच्या खुणांचे दगड बसविणे व त्याला सफेदी देण्यासाठी आवश्यक असलेले मजूर.

(पाच) सर्वेक्षण व सीमांकन यामध्ये सीमारेखन करणे, चार लहान दगडांची रास उभारणे याचा समावेश होतो.

(सहा) निरनिराळया मांडणीशी अनुरुप असा, निरनिराळी क्षेत्रे (झोन) दर्शविणारा मांडणी नकाशा तयार करणे.

(सात) नालाबांध बंदिस्ती व घळी बुजविणे (गल्ली प्लगिंग) यासह मृदसंधारणाची किरकोळ कामे.

(आठ) कामाच्या ठिकाणी आवश्यकता असल्यास झाडांची मुळे/बुंधे काढून टाकणे.

-----------------------------------

## जोडपत्र पाच

(वनीकरण व सामाजिक वनीकरण विभागाकरिता लागू)

वनीकरण व सामाजिक वनीकरणाच्या खालील बाबींवर काम करणा-या मजुरांना विहित केलेल्या दराप्रमाणे प्रतिदिन मजुरी द्यावी :-

| अनु-क्रमांक | कामाची बाब |
|---|---|
| १ | १०० मीटर अंतरावरुन (सागाचे स्टंप आणून लावणे). |
| २ | २०० मीटर अंतरावरुन रोपे आणून लावणे. |
| ३ | २०० मीटर अंतरावरुन पॉलिथिलिनच्या पिशवीतील रोपे आणून लावणे.<br>(एक) लहान पिशवीतील रोपे.<br>(दोन) मोठ्या पिशवीतील रोपे. |
| ४ | मध्यवर्ती ठिकाणपासून रोपे वाहून नेणे व ती आदेशानुसार टी.सी.एम. नाल्याच्या बांधावर लावणे. |
| ५ | गवताच्या रोपांच्या वाफ्यामध्ये (टसॉकची रोपे) रोपे लावणे. |
| ६ | रोपट्यांच्या सभोवतालो १ मीटर व्यासाच्या जागेतून तण काढून रोपटे मध्यभागी आणणे, त्यात अनावश्यक तण/ झाडोरा न ठेवणे ( त्या कामात पीक कापणी अंतर्भूत नाही) आणि गोळा झालेले तण रोपट्याच्या दोन रांगाच्या मध्ये निदेशाप्रमाणे ठेवणे --<br>(अ) अल्प घनता.<br>(ब) साधारण घनता.<br>(क) भरपूर घनता. |
| ७ | उरळीवरील रोपांच्या दोन्ही बाजूस असलेल्या अर्धा मीटर रुंदीच्या पट्ट्यामधील सर्व तण काढून टाकणे, त्यावर अनावश्यक तण/ झाडोरा न ठेवणे व निदेशाप्रमाणे हा सर्व कचरा दूर फेकणे--<br>(अ) अल्प.<br>(ब) साधारण. |
| ८ | पॉलिथिलीन पिशव्यातील रोपांसाठी, सरासरी ५० मीटर अंतरावर उपलब्ध असलेल्या सामग्रीचा वापर करुन काटेरी कुंपण घालणे (आवश्यकता असेल तर योग्य प्रकारे लाकडी खुंट्यांनी आधार देण्यात यावा). |
| ९ | १०० मीटर अंतरावरुन रोपवाटिकेतील पॉलिथिलीन पिशव्यांतील रोपांना पाणी घालणे (पिशव्यांचा आकार सेंटीमीटरमध्ये)--<br>(अ) १० x २० (ब) १२.५ x २५<br>(क) २५ x ३५ (ड) ३५ x ४५ |
| १० | १०० ते २०० मीटर अंतरावरुन पाणी आणून रोपवाटिकेतील पॉलिथिलीन पिशव्यांतील रोपांना झारीने पाणी घालणे (पिशव्यांचा आकार सेंटीमीटरमध्ये)--<br>(अ) १० x २० (ब) १२.५ x २५<br>(क) २५ x ३५ (ड) ३५ x ४५ |
| ११ | विविध जातीच्या रोपट्यांसाठी गोळा करण्यात आलेल्या सामग्रीचे निदेशाप्रमाणे काटेरी कुंपण घालणे (आवश्यकता असल्यास आधाराची तरतूद करणे.) |
| १२ | निदेश दिल्याप्रमाणे कोणत्याही आकाराच्या वाफ्यात १५ सेंटीमीटर अंतरावर रांगेने आवश्यक बी पेरणे. |
| १३ | रोपवाटिकेतील कोणत्याही आकाराच्या वाफ्यावरील रोपटी सोडून इतर अनावश्यक तण वनस्पती काढून टाकणे व कोणतेही तण/ झाडोरा न ठेवता व निदेश दिल्याप्रमाणे काढलेले तण/ वनस्पती अंदाजे १०० मीटर अंतरापलीकडे नेऊन टाकणे --<br>(अ) पहिल्यांदा तण काढणे.<br>(ब) नंतर तण काढणे. |
| १४ | निदेश दिल्याप्रमाणे सागवानाचे खुंट टिकावाने खोदून काढणे. मुळे ३० सेंटीमीटर जमिनीत खोल गेलेली असल्यास ती कापणे व मध्यवर्ती ठिकाणी त्यांचा ढीग करणे. |

| अनु-क्रमांक | कामाची बाब |
|---|---|
| १७ | निदेश दिल्याप्रमाणे रोपवाटिकेतील कोणत्याही आकाराच्या वाफ्यातील रोपटी सोडून इतर अनावश्यक सर्व तण/वनस्पती काढून ते क्षेत्र साफ करणे व हा सर्व कचरा १०० मीटर अंतरापलीकडे नेऊन टाकणे -<br>(अ) पहिले तण काढणे.<br>(ब) नंतरचे तण काढणे. |
| १८ | रोपवाटिकेच्या वाफ्यातून बीज रोपे उपटून काढणे व ती आवेष्टीत (पॉकिंग) करणे. |
| १९ | (काडीचा खर्च वगळून) १ मीटर उंचीच्या काडीचा रोपांना आधार देण्यासाठी काडया कलम रोपांना बांधणे. |
| २० | स्थानिकरित्या झुडूपापासून मिळणा-या सामग्रीपासून आंब्याच्या झाडाची रोपटी वा कलमे यासाठी छपराची तरतूद करणे (यात झुडूपे कापणे/तोडणे व निदेश दिल्याप्रमाणे जागेवर मातीच्या आधाराने ती उभी करणे या कामाा समावेश आहे, पण सामग्रीचा खर्च अंतर्भूत नाही.) |
| २१ | रोपवाटिकेत रोपांना खताची मात्रा देणे / फवारणीकरिता. |

**जोडपत्र सहा**

(सर्व कार्यान्वयीन यंत्रणेकरिता लागू)

१. या दरपत्रकामध्ये अकुशल बाबींसाठी अकुशल मजुरांना दयावयाच्या मजुरीसंबंधीचे दर निर्धारित करण्यात आले आहेत. कुशल बाबींसाठीचे दर त्या त्या खात्याच्या विहित दरसूचीनुसार देण्यात यावेत.

२. कठीण खडकात खोदाई करणे (सुरुंग लावून अथवा सुरुंग विरहीत) ही बाब पूर्णपणे कुशल समजण्यात यावी.

३. माती/मुरुम/ वाळू इत्यादी खाणीतून खोदून गाडीत भरुन त्याची १०० मीटर अंतरापलीकडे वाहनाद्वारे वाहतूक करुन भरावासाठी योग्य जाडीचे थर करणे वा रस्त्याच्या कामासाठी योग्य आकाराचे ढीग करणे या सर्व बाबी एकमेकांवर अवलंबून असल्यामुळे हया कुशल बाबी समजण्यात याव्यात व त्यासाठी खात्याने दर वापरावेत.

४. रस्त्यांच्या कामासाठी तसेच इतर कामांसाठी जेव्हा मजुरांकडून खडी फोडून पुरविण्याचे काम करावयाचे असेल त्यावेळी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीतील दरानुसार मजुरांना मजुरी देण्यात यावी व तशीच तरतूद अंदाजपत्रकात करण्यात यावी. अशा परिस्थितीत देण्यात येणारी मजुरी अकुशल खर्चात समाविष्ट करावी.

५. अकुशल बाबींच्या सामग्रीची रॉयल्टीची रक्कम जिल्हाधिका-यांनी महसूल खात्याकडे अकुशल बाबींचे काम पूर्ण झाल्यानंतर वर्ग करावी. रोहयोच्या अकुशल बाबींच्या दरसूचीमध्ये रॉयल्टीचा अंतर्भाव केलेला नाही.

कुशल बाबींकरिता त्या त्या खात्याची दरसूची वापरावयाची असल्यामुळे व जर खात्याच्या बाबीमध्ये रॉयल्टीचा अंतर्भाव केला असल्यास कंत्राटदारामार्फत रॉयल्टी चार्जेस महसूल खात्याकडे द्यावे लागतील व अशी तरतूद त्या निविदेमध्ये करावी.

सा.बां.विभागाच्या दरसूचीतील बाबींच्या दरात रॉयल्टी चार्जेस अंतर्भूत केली असल्याचे दिसते. परंतु जलसंपदा विभागाच्या दरसूचीत रॉयल्टी चार्जेस अंतर्भूत केली नसल्याचे दिसते. तेव्हा कुशल भागाची कामे करताना खात्याच्या दरसूचीतील बाबींच्या दरात रॉयल्टी चार्जेस अंतर्भूत आहेत अथवा नाहीत असा स्पष्ट उल्लेख निविदेमध्ये करावा.

४. कामाची गुणवत्ता राखण्यासाठी खात्याच्या नियमानुसार घ्यावयाच्या गुणनियंत्रण चाचण्याकरिता अंदाजपत्रकात अशी तरतूद करावी व यावरील खर्च कुशल भागात अंतर्भूत करावा.

---------------------